महावितरण

# जाहीर सुचना

दिनांक १९.०३.२०२५ च्या जाहिरातीस अनुसरुन, अधिक्षक अभियंता, महावितरण, मंडळ कार्यालय, परभणी यांच्या आस्थापनेवर सन २०२५-२६ करिता NCVT अंतर्गत वीजतंत्री / तारतंत्री (Designated Trade) या स्वतंत्र व्यवसायासाठी आय.टी.आय. उत्तीर्ण उमेदवाराकडून एक वर्ष कालावधी करिता शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी वीजतंत्री ५५ व तारतंत्री ५५ अशी एकूण ११० पदे भरण्यासाठी पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पध्दतीने दि.२४.०३.२०२५ ते ३१.०३.२०२५ संध्याकाळ ०६.१५ वाजेपर्यत www.apprenticeshipindia.org.in या संकेत स्थळावर आस्थापना कोड E०४२१२७००२२५ वर ऑनलाईन अर्ज मागवण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने उपरोक्त प्रमाणे अर्ज केलेल्या परभणी जिल्हा रहिवाशी असलेल्या उमेदवारांनी दि.१९.०५.२०२५ ते दि.२१.०५.२०२५ रोजी सकाळी १०.३० ते सायं.०५.३० यावेळेत स्वत:हजर राहून खालील प्रमाणे कागदपत्रे महावितरण लघु प्रशिक्षण केंद्र, मंडळ कार्यालय, विद्युत भवन परभणी येथे सादर करावीत.

१) Online अर्जाची प्रत, २) ITI प्रमाणपत्र व गुणपत्रके, ३) दहावीचे गुणपत्रक, ४) जातीचे प्रमाणपत्र, ५) EWS प्रमाणपत्र, ६) दिव्यांग असल्यास दिव्यांग प्रमाणपत्र, ७) आधार कार्ड, ८) पॅन कार्ड, ९) वर्तमान काळातील पासपोर्ट साइज एक फोटो, १०) नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र वर्ष २०२४- २५, ११) अधिवास प्रमाणपत्र.

व तसेच उपरोक्त कालावधी मध्ये प्राप्त झालेल्या उमेदवारांचे कागदपत्राची पडताळणी करुन ITI च्या गुणवत्तेनुसार योग्यता यादी जाहीर करण्यात येईल, मुळ कागदपत्रे तपासणी वेळी काही तफावत अथवा माहिती चुकीची आढळल्यास उमेदवारांची निवड कुठल्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल कृपया याची नोंद घ्यावी तसेच शिकाऊ उमेदवाराने राजकीय किंवा संघटना व इतर अधिकाऱ्याकडून दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. भरती प्रक्रियेमध्ये आवश्यकता भासल्यास कोणताही बदल करण्याचे किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे, नमूद पदे कमी-जास्त करण्याचे तसेच भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखून ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

तसेच ज्या उमेदवारांनी Online अर्ज केला आहे परंतु उमेदवारांनी उपरोक्त कालावधीत कागदपत्रे सादर केली नाहीत. अशा उमेदवारांच्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**PRO No.७१ Dtd.०८.०५.२०२५**

**अधिक्षक अभियंता, महावितरण, मंडळ कार्यालय, परभणी**